# ऑनलाइन वार्षिक सभा

## ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

सन्माननीय सभासद बंधू भगिनी,

आपणास विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप. बँक लि., **संगमनेर या बँकेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २६-०९-२०२१ रोजी सायं. ठीक ६.०० वा. मालपाणी हेल्थ क्लब, संगमनेर** येथे कोविड १९ साथीच्या महामारी पार्श्वभूमीवर ऑनलाईन **'ऑडिओ व्हिज्युअल'' (झूमच्या) माध्यमद्वारे** बँकेचे अध्यक्ष **श्री. राजेश ओंकारनाथ मालपाणी** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी कृपया सभासदांनी **झूम ॲप डाऊनलोड करुन घ्यावे** व खालील नमूद लिंक किंवा मिटिंग आयडी व पासवर्ड वापरुन केलेल्या सुचनेप्रमाणे सभेस 'ऑनलाईन' हजर रहावे ही नम्र विनंती.

### विषय पत्रिका

वि.क्र. १: शनिवार दि. २७ मार्च २०२१ रोजी झालेल्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

वि.क्र. २: दि. ३१ मार्च २०२१ अखेरच्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेल्या कामकाजाचा **अहवाल** वाचून त्यास मंजुरी देणे.

वि.क्र. ३: दि. ३१ मार्च २०२१ अखेरच्या **ताळेबंद व नफा तोटा पत्रकास** मंजुरी देणे.

वि.क्र. ४: सन २०२०-२१ या वर्षाच्या मा. वैधानिक लेखापरीक्षकांच्या ऑडिट रिपोर्टची वाचून नोंद घेणे.

वि.क्र. ५: सन २०१९-२० या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.

वि.क्र. ६: संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि. ३१ मार्च २०२१ अखेरच्या **नफा वाटणीस** मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

वि.क्र. ७: सन २०२०-२१ साठी शिफारस केलेल्या **वार्षिक अंदाजपत्रकास** मंजुरी देणे.

वि.क्र. ८: मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक दि. २७-०४-२०२१ नुसार त्यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावास अधिन राहून सन २०२१-२२ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या मा. वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीस संमती देणे.

वि.क्र. ९: संचालक मंडळ सदस्य व त्याच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाचे विवरणपत्र वाचून नोंद घेणे.

वि.क्र. १०: मा. रिझर्व्ह बँकेच्या दि. २५/०६/२०२१ च्या परिपत्रकानुसार मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या व त्यांच्या मंजुरीस अधिन राहून नविन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्तीस संमती देणे.

वि.क्र.११: आजच्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन उपस्थित असलेल्या सभासदांची उपस्थिती मंजूर करणे.

वि.क्र.१२: मा. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार

स्थळ : संगमनेर
दिनांक : .०५-०८-२०२१

**(गोपाळ अनिरुद्ध गांगल)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

### वार्षिक सभेस ऑनलाइन उपस्थिती बाबत सूचना

**१) ऑनलाइन लॉगिंन बाबत सूचना**

अ) ऑनलाइन झूम मिटींग फक्त संगमनेर मर्चंट बँकेच्या सभासदांसाठीच आहे.

ब) गुगल / ॲपल प्लेस्टोर वरुन झूम ॲप डाऊनलोड करा. (झूम ॲप डाऊनलोड केलेले नसल्यास )

क) बँकेने आपल्या रजिस्टर मोबाईलवर एसएमएस/व्हॅटस् ॲप व्दारे मिटींग लिंक पाठविलेली आहे. किंवा खालील लिंकवर क्लीक करुन झूम मिटींग ऑनलाइन जॉईन करा./उपस्थित रहा.
https://us02web.zoom.us/j/82331154607?pwd=Mkw1TDg5UmNtTk9wanRyUXFIVjF4Zz09
Meeting ID: 823 3115 4607 Passcode: smbank

२) झूम मिटींग जाँईंन करण्यापुर्वी आपले पुर्ण नांव लिहीणे गरजेचे आहे (क्रियाशील सभासदासाठी व मिटींग हजेरीसाठी संपूर्ण नाव लिहीणे अत्यंत आवश्यक आहे.)

३) ऑनलाइन मिटींग दरम्यान आपला व्हिडीओ सुरु ठेवावा.

४) बँकेचा सन २०२०-२१ चा संपूर्ण वार्षिक अहवाल बँकेच्या वेबसाईट www.smbank.in वर उपलब्ध आहे. किंवा खालील नमूद केलेल्या लिंकला क्लीक करुन वार्षिक अहवाल पाहण्यासाठी डाऊनलोड करावा ही विनंती.

https://smbank.in/download/AnnualReport.pdf

५) बँकेच्या सन २०२०-२१ मधील कामकाजाबाबत सन्माननीय सभासदांच्या काही सूचना व प्रश्न असल्यास त्या त्यांनी लेखी स्वरुपात अर्ज बँकेच्या संगमनेर येथील प्रधान कार्यालयात समक्ष, पोस्टाने, कुरिअर किंवा ई-मेलव्दारे गुरुवार दि.२३/०९/२०२१ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मिळतील अशा रितीने पाठवावे.

६) आपल्याला ऑनलाइन मिटींग मध्ये काही विषय / सूचना मांडायचे असल्यास अथवा चर्चेत भाग घ्यावयाचा असल्यास झूम ॲपच्या माध्यमाने Raise Hand या विकल्पाचा वापर करावा.

७) बँकेचा सन २०२०-२१ अखेरचा ऑडीट रिपोर्ट व ५५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या संगमनेर येथील प्रधान कार्यालयात पहावयास मिळेल.तसेच वार्षिक अहवाल प्रत बँकेच्या ८ शाखा व प्रधान कार्यालय,संगमनेर येथे सभासदास फक्त पाहण्यासाठी व वाचण्यासाठी नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.

८) ऑनलाइन गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी ऑनलाइनवर त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

९) कृपया सभासदानी आपला मोबाईल नंबर /ईमेल आयडी बँकेकडे फॉर्म भरुन व सही करुन जवळच्या कोणत्याही शाखेत द्यावा.यांनी अद्याप भरुन दिला नसल्यास त्यांनी तत्काळ कोणत्याही शाखेत नमुना फॉर्म त्वरीत सभेपुर्वी अवश्य भरुन द्यावा ही विनंती व सहकार्य करावे.

१०) सभासदांची सन २०२०-२१ च्या सभेतील ऑनलाइन उपस्थिती ही क्रियाशील सभासदत्वासाठी ग्राह्य धरली जाईल.

११) मालपाणी हेल्थ क्लब संगमनेर हे सभास्थान मानन्यात येईल. तरी सदर सभेस सभासदांनी फक्त ऑनलाईन उपस्थित रहावे हि विनंती. सदर उपस्थिती क्रियाशील सभासदत्वासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

## मतदानासाठी पात्रता निकष

### सभासदांना आवाहन

**१. किमान रु.१०००/- चे भागभांडवल धारण केलेले पाहिजे.**

**२. किमान रु.५०००/- ची ठेव (ठेवधारक) किंवा रु.५०,००० चे कर्ज (कर्जदार) घेतले असले पाहिजे.**

**३. सलग पाच वर्षामध्ये (२०१६-१७ ते २०२०-२१) किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थिती आवश्यक ऑनलाईन उपस्थिती ग्राह्य धरण्यात येईल.**